लोकमत

# सायबर जनजागृतीसाठी राजर्षी शाहू महाविद्यालयाला पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : येथील राजर्षी शाहू महाविद्यालयास क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड्स' या कार्यक्रमात 'बेस्ट सायबर क्लब ओव्हरऑल' हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र सायबर पोलिस दलाचे डीआयजी संजय शिंत्रे यांच्या हस्ते देण्यात आला.

या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. जीत बुधोडकर याला 'बेस्ट पीआर मीडिया डायरेक्टर' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण या सायबर वॉरियर्सना 'बेस्ट आऊटरीच टीम' म्हणून गौरविण्यात आले. यावेळी फाउंडेशनच्या अध्यक्ष अनुपमा काटकर, कैलास काटकर, डॉ. संजय काटकर, अजय शिर्के, गायत्री केसकर, दीपू सिंग आदी उपस्थित होते. सायबर सुरक्षाविषयक जनजागृती, विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढविणे आणि सुरक्षित इंटरनेट वापरासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सायबर क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये तसेच समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत प्रभावी जनजागृती केली. प्रा. ज्योती माशाळकर, जयश्री जटाळ, श्रद्धा पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या यशाबद्दल शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सचिव बी. बी. ठोंबरे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, विभागप्रमुख विश्वनाथ पांचाळ आदींनी सत्कार केला.

**सायबर शिक्षा फॉर सुरक्षा अवॉर्ड, पुणे येथे क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने सन्मान**